The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# 'संत तुकाराम यांच्या अभंगातील विद्रोह '

**प्रा. डॉ. पंजाब शेरे**
**मराठी विभागप्रमुख**
**बळीराम पाटील महाविद्यालय,किनवट जि. नांदेड**

मध्ययुगीन कालखंडात वारकरी संप्रदायाने परिवर्तन घडविण्याचे महान कार्य केले आहे.वारकरी संप्रदायाने सामाजिक समतेचा विचार ,भजन, प्रवचन, कीर्तन,भारुड यामाध्यमातून घराघरात नेला आहे. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखोबा, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गोरोबा, संत मुक्तेश्वर, संत निळोबा, संत बहिणाबाई या सर्व वारकरी संप्रदायातील संतानी अभंगाच्या माध्यमातून समाजाला उपदेश करुन जागे करण्याचे काम केले.सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी शोषण करणा-या प्रस्थापितांच्या विचारधारेला हादरा देणारे अंभग रचना करुन उपदेश देण्याचे महान कार्य केले.

संत तुकाराम यांनी उपदेशात्म अभंगातून लोकांना जागे केले. महाराष्ट्र ही भुमी संताच्या विचारांने पावन झालेली भूमी आहे.संत साहित्यांने मानवी मूल्यांची रुजवण केलेली आहे. माणूस म्हणून जगण्याचे बळ महाराष्ट्रातील संताने दिले आहे. आपण सर्व माणंस आहोत. माणूस म्हणून एकाएकांचा आदर करा.जातीभेद,उच्चनिच्चता ,व्यसनाधीनता, वाईट चालीरिती, प्रथा या विषयी समाजप्रबोधन करुन आपल्या अभंगातून एकतेचा, सामाजिक समतेचा विचार पेरण्याचे महान काम संतानी केले आहे .श्रीविठ्ठलभक्ती ही सर्वश्रेष्ठ भक्ती आहे हे सर्वांनी मानले आहे. श्रीविठ्ठला जवळ सर्व समान आहेत. तो कधीही कुणास कमी लेखत नाही.सर्वांना समान मानतो मग आपण तर माणंस आहोत हा बंधुतेचा विचार सर्वच संतांनी अभंगातून व्यंक्त केला आहे. वारकरी संप्रदायाचे कार्य मानवाला जागे करून जागृकता निर्माण करणे आहे. वारकरी संप्रदायाचा पाया संत नामदेवांनी रचला तर वारकरी संप्रदायाचे कळस म्हणून संत तुकाराम यांचे कार्य मोठे आहे. संत तुकाराम यांचे कार्य वास्तवादी स्वरुपाचे व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे आहे. वेळप्रसंगी अगदी स्पष्टपणे त्यांनी अभंगातून विद्रोहात्म विचारातून मानवतावाद रुजविला आहे.संत तुकाराम हे परिवर्तनवादी विचारांची कास धरणारे क्रांतीकारी विचारवंत आहेत.संत तुकाराम यांचा जन्म 'देहू' या गावी इ.स.१५३० साली झाला.संत तुकाराम यांचा व्यवसाय सावकारकी होता.वारकरी संप्रदायाचे संत नामदेव यांची कीर्तने ,संत ज्ञानेश्वर यांची प्रवचने, संत एकनाथ यांची भारुडे, संत तुकाराम यांची अंभग प्रसिद्ध आहेत.संत तुकाराम यांनी सुमारे साडेचार हजार अभंगाची रंचना केली आहे.संत तुकाराम महाराजांच्या आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील विषमतावादी विचारधारेवर कठोर प्रहार करतात. समाजात नीतीविचार व भक्तिमार्ग रुजविण्यासाठी प्रयत्न करतात. भक्ती ही निर्मळ असावी म्हणून ढोंगी, भोंदूगिरी करणा-यावर ते भाष्य करतात.एक चिंतनशील, समाजसुधारकाच्या भूमिकेतूनच संत तुकाराम यांचे कार्य मोठे आहे. संत तुकाराम यांचे वडील बोल्होबा, आई कनकाई दोघेही स्वभावाने अत्यंत मयाळू होते. सावकारकी व शेती हा व्यवसाय होता. वारकरी संप्रदायाचे भक्त होते. पढरपुरची 'वारी

'कधीही ते चुकवत नसत. संत तुकाराम महाराज यांच्यावर योग्य ते संस्कार करुन भक्तीमहीमा त्यांच्या मनात निर्माण केले. संत तुकाराम महाराज यांनी आपल्या आयुष्यात अनेक दु:ख सोसले.इ.स.१६२९ मध्ये आई वडीलांचे छत्र हरविले. याच काळात भयानक दुष्काळ पडला. व्यापार मंदावला. पटकीच्या आजाराने अनेकांचे निधन झाले. शेती आणि व्यवसाय बुडाले. संत तुकाराम महाराज यांची पत्नी, मुलगा अन्नावाचून गेले. या आशा भयान परिस्थितीत संत तुकाराम महाराज खचून गेले. जीवन हरवल्यागत जगू लागले. पुढे त्यांनी इंद्रायणी नदीमध्ये कर्जखते बुडवून टाकले व भजनाव्दारे, अभंगातून वास्तववादी विचार मांडू लागले."तुकोबा इ. स. १६३३ नंतर भक्तीकडे प्रवृत्त झाले. त्यांच्या उपरतीचा हाच खरा कालखंड असावा ही मनाची उध्दिग्नता तुकोबांनी पराप्राप्तीच्या साधनाकडे आकृष्ट करणारी असावी"१

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा प्रभाव संत तुकाराम महाराज यांच्यावर होता. प्रस्थापिताकडून हीनतेची वागणूक मिळत होती.मानवता सपुष्टात आली होती .

"आता काय खावे कोणीकडे जावे |गावात राहावे कोण्या बळे |
कोपला पाटील गावकीचे हे लोक |आता मज भीक कोण घाली ||"२

येथे तत्कालीन काळातील परिस्थिती लक्षात येते. छळवाद हा प्रस्थापिताकडून होतांना दिसतो.संत तुकाराम यांनी मानवी मूल्ये रुजविली.सामाजिक बांधिलकी निर्माण केले.समतावादी दृष्टिकोन पेरले. अंधश्रद्धा, भोंदूगिरी, फसवेगिरी, विषमतावादी विचाराविरुध्द स्पष्टपणे अभंगातून आवाज उठविला आहे.मानवता ही सर्वश्रेष्ठ आहे.म्हणून संत तुकोबा म्हणतात

"काय बा करिशी सोवळे ओवळे|
मन नाही निर्मळ वाउगेचि|| ४३३२.१
सोवळया ओवळया राहिलो निराळा ||
पासूनि सकळा अवघ्या दुरी ||३९.२
विटाळ तो परद्रव्य परनारी |
येथूनि जो दुर तो सोवळा ||९८९.१" ३

संत तुकाराम महाराज यांनी जात ही महत्वाची मानली नाही. माणूस हाच महत्त्वाचा मानला आहे. मानवाने अस्पृश्यता मानू नये हा त्यांचा विचार समतापूरक होता. मानवीमूल्य हीच खरी जीवनपद्धती असावी असा त्यांचा विचार होता. बरे झाले देवा मला कुणबी केले.अन्यथा शुद्र समजून माझा येथे प्रस्थापिताने छळ केला असता.

"बरा देवा कुणबी केलो |
नाही तरी दंभेचि असतो मेलो||१||
भले केले देवराया |
नाचे तुका लागे पाया ||२||
विद्या असती काही |
तरी पडतो अपयी ||३||

सेवा चुकतो संताची |
नागवण हे फुकाची ||४||
गर्व होता ताठा |
जातो यमपंथे वाटा ||५||
तुका म्हणजे थोरपणे |
नरक होती अभिमाने ||६||४
आपण कुणबी असल्याचा आनंद ते व्यक्त करतात. नाचत देवाच्या पायी लागतात.
"तुकोबांच्या मनाची घडण काही अपघात चमत्कारात घडलेली नव्हती तर बाह्य जगाच्या निरीक्षणातच वाढीस लागली होती. त्यामुळेच त्यांचे तत्वज्ञान ज्ञानमार्गाच्या पंडिती शब्दवैशिष्टयात गुरफटून न जाता अनुभवजन्य आत्मबोधतच साकारले आहे. "५
संत तुकाराम यांचे तत्वज्ञान व भक्ती मार्गाचा विचार स्पष्ट होते. सर्वसामान्य जनतेची वेदना ते अभंगातून मांडत होते. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगातून विद्रोह व्यक्त होतांना दिसतो.
"हट्टाग्रही सनातनी, अहंकारी पंडित, दांभिक समाजकंटक यांची बिगे बाहेर काढून त्यांना जरब बसविणारी मर्मभेदक टीका तुकारामानी केली आहे. त्याच्या अभंगांवरुन लोकव्यवहाराचे बारीक निरीक्षण, मनुष्यस्वभावाचे सूक्ष्म ज्ञान, जबरदस्त, आत्मविश्वास तडफदार वृत्ती हे निष्ठावंत समाजसुधारकांचे गुणविशेष तुकारामांच्या ठीकाणी होते याची खात्री पटते "६
संत तुकाराम हे समाजाचे बारकाव्याने निरिक्षण करीत होते.माणसाच्या स्वभावाचे वर्णन करीत असते. या देशाचा पोशिंदा यांच्या घरची दारिद्रमय परिस्थितीचे वर्णन आपल्या अभंगातून करतात.
शेतकरी व शेतक-याचे दु:ख मांडताना संत तुकाराम म्हणतात.
मढे झाकुनिया करिती पेरणी |
कुणबियाचे वाणी लवलाहे ||
तयापरी करी स्वहित आपुले |
जयासी फावले नरदेह|| ७
समाजातील अंधश्रद्धा नष्ट व्हावी यासाठी कृतीशील कार्य केले. या संदर्भात डॉ. यशवंत पाठक म्हणतात ' तुकोबांनी केवळ उपदेशकाच्याच भूमिकेतून लोकजागृती केली असे नाही तर कृतिशील विचारवंताच्या भूमिकेतून समाजा पुढे वास्तववादी विचार मांडले, त्यांनी मेणाहून मऊ होऊन समाजाला मार्गदर्शन केले. प्रसंगी वज्राहून कठीण होणारे तुकोबाही आपल्याला अभंगातून दिसतात'८
भोंदूगिरी संदर्भात म्हणतात.
"ऐसे कैसे जाले भोंदू |
कर्म करोनी म्हणती साधू ||
अंग लावूनिया राख |
डोळे झाकुनी करिती पाप ||"९

खर ते खरंच असते. असत्य कधीच खर होत नसते. असत्य हा पापी आहे.

"असत्य जे वाणी तेथे पापाचीच खाणी
सत्य बोले मुखे तेथे उचंबळती सुखे
तुका म्हणे दोन्ही जवळीच लाभ हानी "१०

सत्य बोलणारा हा नेहमी सुखी असतो. माणसाच्या आचार व विचारातूनच प्रगती होत असते. खोटे कधी बोलू नये. सत्य यातच मानवाचे हीत दडलेले असते.

वारकरी संप्रदायातील कळस म्हणून संत जनाबाईने संत तुकाराम यांचा उल्लेख केला आहे. संत तुकाराम यांनी श्रद्धा
ही मानलेली आहे.अंध्दश्रध्देवर
भाष्य करतात.

" भाव नसला तर पाषाण, पितळ, अष्टधातूचे देव काय करतील? देवाजवळ मोक्षाचे गाठोडे नाही. भाव आणि विश्वास म्हणजे श्रद्धा,तीर्थी केवळ दगड आणि पाणी आहे. शरीर धुण्यात काय अर्थ आहे? अंतःकरण मळलेले आहे. कारण जन्मभर खोटे व्यवहार करून ते मन दोषांनी व्यापले आहे. याकरिता आपले मन आधी शुद्ध कर.आपले विचार, आपले हेतू शुद्ध असतील तर शत्रूदेखील मित्र होतील "११

मानवी जीवनाचे मूल्ये संत तुकाराम यांनी सांगितले. आपल्या जगण्याचा हेतू शुद्ध हवा तिथे शत्रू हा मित्र झाल्याशिवाय राहत नाही.

"रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग |
अंतर्बाह्य जग आणि मन"||

ही वास्तव परिस्थिती येथे संत तुकाराम महाराज नोंदवितात.सामाजिक सुख दुःख ,जातीय वर्गवाद नष्ट व्हावे हा विचार येथे व्यक्त होतो.

" जे का रंजले गांजले |
त्यासी म्हणे जो आपुले "

आपण भोंदूगिरी करणारे ओळखावे असे स्पष्ट अभंगातून व्यक्त होतात.

वैकुंठी जो जैसे नाही |
नवल काही काल्याचे ||

जातीयव्यवस्था नष्ट करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा हा विचार पुढे येतो.

सदाचार, नीमीमूल्य, भक्तीचे महत्व समाजाला संतांनी शिकविले. मानवता जोपासावी.मन शुद्ध ठेवावे असा मोलाचा संदेश अभंगातून दिला आहे.संत तुकाराम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी तमळीने प्रयत्नशील राहिले. बुडते जन न दिसल्यामुळे सर्वसामान्यांना सदमार्गाला घेऊन गेले.संत तुकाराम यांचे अभंग हे वास्तवादी, उपदेश करणारे आहेत. दांभिकतेवर प्रहार करणारे आहेत.समाज एकसंघ राहावे.यासाठी कार्य मग्न असत. सामाजिक परिवर्तन व लोकांच्या उद्धारासाठी सतत तळमळ करणारे संत तुकारामांचे कार्य आकाशासारखे विशाल आहे.

संदर्भ :

**'संत तुकाराम यांच्या अभंगातील विद्रोह '**
**प्रा. डॉ. पंजाब शेरे**

१) डॉ.किशोर सानप, प्रा.मनोज तायडे, तुकाराम व्यक्तीत्व आणि कवित्व, प्रकाशन विश्वासराव लोकवाङःमय गृह, भूपेश गुप्ता भवन ८५,सयासी रोड, प्रभादेवी मुंबई, पृष्ठ क्र.१९
२) तत्रैय पृष्ठ क्र. २५
३ प्रा. गौतम निकम, विद्रोही संत, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव जि. जळगाव, प्रथम आवृत्ती १७ आॅक्टोंबर २०१० पृष्ठ क्र. ३८
४) तंत्रैय पृष्ठ क्र. ३६
५)डॉ.किशोर सानप, प्रा.मनोज तायडे, तुकाराम व्यक्तीत्व आणि कवित्व, प्रकाशन विश्वासराव लोकवाङःमय गृह, भूपेश गुप्ता भवन ८५,सयासी रोड, प्रभादेवी मुंबई, पृष्ठ क्र.३१
६) तत्रैय पृष्ठ क्र. ३९
७) नेमाडे भालचंद्र (संपादक ) तुकाराम गाथा, (निवडक अभंग) साहित्य अकादमी, नवी दिल्ली, आवृती दुसरी २००७ पृष्ठ क्र. ०६
८) डॉ. मा.मा.जाधव ,संपादक, अक्षरगाथा, बळीवंश प्रकाशन, नांदेड, १० आॅक्टोंबर २०१० पृष्ठ क्र. ७३
९) डॉ.गणेशचंद्र शिंदे, डॉ. संजय जगताप, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. संगीता घुगे, संपादक, मानवी साहित्य व मानवी मूल्ये, प्रकाशन अजित विहार दिल्ली ,पृष क्र. १९२
१०) तंत्रैय पृष्ठ क्र. २१४
११) मा.मा.जाधव,संपादक,अक्षरगाथ,बळीवंश,नृसिह पॅलेसच्या मागे नरहरनगर, नांदेड,वर्ष नववे,अंक:दुसरा ,जुलै, आॅगस्ट, सप्टेंबर २०१८ पृष्ठ क्र. ९